# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय (स्थायी) सभा दिनांक १२/१०/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १२/१०/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत करावयाच्या / केलेल्या कामांच्या निवीदा सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यानुसार विहित मुदती प्राप्त कमी दरांच्या निविदांवर विचारविनिमय करून कमी दरांच्या निविदांना मंजुरी तथा कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याकरिता प्रशासकीय (स्थायी) सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानुसार प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या कामांच्या निविदांचा तुलनात्मक अहवालावरील मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.

**विषय क्र १ :- मलकापूर शहरातील सार्वजनिक शौचालय सफाई करिता सन २०२३-२४ साठी प्राप्त कमी दराच्या निविदेस मान्यता देणे बाबत.**

**विषय क्र २ :- मलकापूर न.प. अंतर्गत सन २०२३ मध्ये बायोमायनिंगच्या कामा करिता प्राप्त कमी दराच्या निविदेस मान्यता देणे बाबत.**

**विषय क्र १ :- मलकापूर शहरातील सार्वजनिक शौचालय सफाई करिता सन २०२३-२४ साठी प्राप्त कमी दराच्या निविदेस मान्यता देणे बाबत.**

वरील कामाची ई-निवीदा न.प. निधी अंतर्गत दिनांक १८/०९/२०२३ ते २५/०९/२०२३ या दरम्यान मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील प्रमाणे विहित मुदतीत निवीदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

Tender ID :- 2023_DMA_946208_1

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | आदर्श बेरोजगार बहुउद्देशीय सेवा सह. संस्था, नागपूर. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९० % कमी दराने |
| २ | एम. जाहेद अ. सलाम शेख | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७ % कमी दराने |
| ३ | **श्री साई वाल्मिकी सफाई कामगार बहुउद्देशीय संस्था, चिखली.** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९९ % कमी दराने** |

वरील सर्व बाबींचा विचार करता सर्वात कमी दर **श्री साई वाल्मिकी सफाई कामगार बहुउद्देशीय संस्था, चिखली** यांचे असून, त्यांच्या कमी दाराच्या निविदेस तसेच सदर खर्च नगर परिषद निधी अंतर्गत करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र २ :- मलकापूर न.प. अंतर्गत सन २०२३ मध्ये बायोमायनिंगच्या कामा करिता प्राप्त कमी दराच्या निविदेस मान्यता देणे बाबत.**

वरील कामाची निवीदा स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत दिनांक २९/०९/२०२३ रोजीच्या दैनिक सामना या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे विहित मुदतीत निवीदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

वर्तमानपत्र :- दैनिक सामना दिनांक २९/०९/२०२३

Tender ID :- 2023-DMA_949078_1

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1 | ओम एंटरप्राईजेस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० % अधिक दराने |
| 2 | दीपज्योती मार्केटिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५ % अधिक दराने |
| 3 | **अल्फा** कॉर्पोरेशन | अंदाजपत्रकीय दराने |

वरील सर्व बाबींचा विचार करता, सर्वात कमी दर म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराने** **अल्फा कॉर्पोरेशन** यांचे असून, त्यांच्या कमी दाराच्या निविदेस तसेच सदर खर्च स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

(आर.यु.सुरडकर)
प्रशासक
नगर परिषद मलकापूर